दै. सकाळ दि. ०६.०७.२०२३

दै. सकाळ ०६.०७.२०२३



नांदेड : सायबर पोलिसांनी हरवलेल्या १०२ मोबाइलचा शोध लावला असून त्यापैकी ४५ जणांचे मोबाइल बुधवारी जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते संबंधिताना देण्यात आले.

# हरवलेले १०२ मोबाइल हस्तगत

## सायबर पोलिसांची कार्यवाही; ४५ मोबाइल दिले परत

नांदेड, ता. ५ (बातमीदार) : शहर आणि जिल्ह्यातील तक्रारदारांकडून हरवलेल्या मोबाईलमध्ये पोलिस अधीक्षक कार्यालयातील सायबर पोलिसांनी १५ लाख ४९ हजार रुपये किंमतीच्या १०२ मोबाईलचा शोध लावला आहे. त्यापैकी ४५ जणांना मोबाईलचे वाटप बुधवारी (ता. पाच) जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलीस अधिक्षक कोकाटे यांनी सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक जी. बी. दळवी यांना आदेशीत केले होते. त्यानुसार सायबर सेलचे एक पथक व जिल्ह्यातील सर्व उपविभागाचे पथक तयार करून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याची मोहिम राबविण्यात आली होती. सर्व उपविभागातील पथकाने व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन घेत जिल्ह्यातील १५ लाख ४९ हजार रुपये किंमतीचे एकूण १०२ मोबाईल हस्तगत केले आहेत. त्यापैकी बुधवारी एकत्रितरीत्या पोलीस अधिक्षक कोकाटे यांच्या हस्ते ४५ मोबाईलचे वाटप करण्यात आले आहे.

उर्वरीत मोबाईलचे आयएमईआय क्रमांकाची माहिती नांदेड पोलीस दलाचे फेसबुक पेज आणि ट्विटरवर आहेत. नागरिकांनी आपल्या हरवलेल्या मोबाईलचा आयएमईआय क्रमांक ओळखून सायबर पोलिस ठाणे येथून मोबाईल घेऊन जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराय धरणे, डॉ. अश्विनी जगताप, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर विभागाचे फौजदार दळवी, सोपान थोरवे, पोलीस अंमलदार सुरेश वाघमारे, राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, विलास राठोड, रेश्मा पठाण, अनिता नलगोंडे, दाविद पिडगे, दिपक शेवाळे, मोहन स्वामी, किशोर जैस्वाल, काशिनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, सौरभ सिद्धेवार यांनी पार पाडली आहे. याबाबत पोलीस अधिक्षक कोकाटे यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.